**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**मंत्रालय, मुंबई 400 032.**
**शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र.अविप्र 10.08/ प्र.क्र.14/ अर्थसंकल्प-4,**
**दिनांक : 28 एप्रिल 2008**

संदर्भ : 1) शासन निर्णय,वित्त विभाग क्र.संकीर्ण1006/प्र.क्र.131/कोषाप्रशासन-5,दि. 15.5.2007.

2) वित्त विभाग पत्र क्र.अविप्र 11.07/ प्र.क्र.32/ अर्थसंकल्प-1,दि. 10.08.2007.

3) शासन परिपत्रक, वित्त विभाग क्र :अविप्र 11.07/प्र.क्र.32/अर्थसंकल्प-1, दि.9 .1.2008.

. 4) शासन परिपत्रक, वित्त विभागक्र :अंदाज 10.08/प्र.क्र.125/2008अर्थसंकल्प-3, दि.22 .4.2008.

**परिपत्रक**

महाराष्ट्र विनियोजन विधेयक २००८ (महाराष्ट्र विनियोजन (लेखानुदान) अधिनियम, २००८ यांच्या अनुसूचीच्या स्तभ ४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या रकमांसह ) यास विधानमंडळाने मंजूरी दिलेली असून महाराष्ट्राचे राज्यपाल यांनी त्यास संमती दिलेली आहे, आणि ते २००८ चा अधिनियम क्रमांक ९ म्हणून महाराष्ट्र राजपत्र असाधारण भाग ८ दिनांक १७ एप्रिल, २००८ यामध्ये प्रसिध्द करण्यात आले आहे. याबाबतचे अनुषंगिक आदेश उपरोक्त संदर्भाधीन क्र. ४ च्या परिपत्रकान्वये निर्गमित करण्यात आलेले आहेत.

२. २००८-०९ या आर्थिक वर्षाकरिता उपलब्ध झालेले अर्थसंकल्पिय अनुदान वित्त विभागाकडून अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर वितरित करण्यात येईल. त्यानंतर प्रशासकीय विभागांनी सदर अनुदान त्यांचे अधिनस्त नियंत्रक अधिका-यांना व त्यांचेमार्फत आहरण व संवितरण अधिकारी यांना अर्थसंकल्प वितरण प्रणालीवरच वितरित करावयाचे आहे.

३. अर्थसंकल्पातील खालील बाबींवरील अर्थसंकल्पिय तरतूदी वित्त विभागाच्या अनुमतीशिवाय खर्च करता येणार नाहीत. ज्यावेळेस या तरतूदी वितरित करावयाच्या असतील, त्यावेळेस तरतूद वितरित करणेस मान्यता देणेबाबतचा प्रस्ताव वित्त विभागाकडे मान्यतेस्तव पाठविणे विभागांना आवश्यक राहील.

(अ) बाराव्या वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार केलेल्या सर्व तरतूदी.
(ब) केंद्र शासनाकडून प्राप्त होणारा निधी व राज्य शासनाच्या हिश्श्याचा निधी याविषयीच्या तरतूदी केंद्र शासनाकडून निधी प्रत्यक्ष प्राप्त झाल्याशिवाय वितरित करता येणार नाहीत.
(क) भांडवली अर्थसंकल्प विहित पध्दतीने मंजूर झाल्याशिवाय महामंडळाच्या भांडवली अंशदानासाठी केलेल्या तरतूदी.
(ड) विद्युत महामंडळ व त्याअंतर्गत असणा-या कंपन्या यांना देय अर्थसहाय्य, भाग भांडवल व कर्जाच्या तरतूदी.
(इ) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन मडळास सवलतीपोटी देय अर्थसहाय्याच्या तरतूदी.
(फ) ७६१५ - संकीर्ण कर्जे या प्रधान शीर्षखालील अर्थोपाय व आगाऊ रकमा.
(ग) २०५९- सार्वजनिक बांधकामे या प्रधान शीर्षखालील प्रतिबिंबित तरतूद (Shadow provision).
(ह) पुस्तकी समायोजनाच्या रकमा.

**४. सर्व प्रशासकीय विभागांना सन २००८-०९ या आर्थिक वर्षामध्ये उपलब्ध झालेले अर्थसंकल्पिय अनुदान मंजूर मासिक निधी विवरणपत्रानुसार खर्च करणे अनिवार्य राहील. तथापि प्रशासकीय विभागांना उपलब्ध झ ाालेला निधी मासिक निधी विवरणपत्रानुसार खर्च न झाल्यास असा अखर्चित राहिलेला निधी विभागांना डिसेंबर २००८ पर्यंत पुढे ओढून (Carry Forward) घेता येईल.**

५. या व्यतिरिक्त काही प्रशासकीय विभागांतर्गत आकस्मिक कारणांसाठी वापरात असणारी लेखाशीर्षे तसेच खाली नमूद बाबीं जेथे आकस्मिक स्वरूपाचे खर्च उद्‌भवू शकतात अथवा विहित विवरणपत्राप्रमाणे खर्च करणे विभागांना शक्य नसते हे लक्षात घेऊन अशा बाबींसाठी मासिक निधी विवरणपत्र बदलण्याचे पूर्ण अधिकार विभागांना देण्यात येत आहेत.

1) केंद्र शासनाकडून प्राप्त होणारी अनुदाने
2) ज्यांचे वार्षिक अनुदान रु. 1.00 कोटी पेक्षा कमी आहे अशी सर्व अनुदाने.
3) "2245, नैसर्गिक आपत्तीच्या निवारणासाठी सहाय्य" या प्रधान लेखाशीर्षाखालील निधी,
4) महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय व विधानमंडळ सचिवालयांतर्गत मा. आमदारांनी स्वत: आहरण व संवितरण अधिकारी म्हणून सादर करावयाची देयके,
5) "2505, ग्रामिण रोजगार" या मुख्य लेखाशीर्षांतर्गत रोजगार हमी योजने अंतर्गत मजूरीच्या देयकांकरिता प्राप्त होणारा निधी,
6) आमदार स्थानिक विकास कार्यक्रम, डोंगरी विभाग विकास कार्यक्रम, वैधानिक विकास मंडळांतर्गत प्राप्त होणारा निधी

   आमदार स्थानिक विकास कार्यक्रम, डोंगरी विभाग विकास कार्यक्रम, वैधानिक विकास मंडळांतर्गत व रोजगार हमीच्या योजनेसाठी सादर होणाऱ्या एप्रिल, 2008 ते मार्च, 2009 या कालावधीतील प्रत्येक महिन्यातील मंजूर निधी 31 मार्च, 2009 पर्यंत खर्च करण्यास मुभा राहिल व त्यासाठी वित्त विभागाच्या स्वतंत्र परवानगीची गरज राहणार नाही.
7) उच्च न्यायालय, मुंबई, नागपूर, औरंगाबाद खंडपीठ यांची कार्यालये,
8) राज्यातील सर्व जिल्हा न्यायालये व जलद गती न्यायालये,
9) महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरणाची मुंबई, नागपूर व औरंगाबाद येथील कार्यालये,
10) "7610-शासकीय कर्मचा-यांसाठी कर्जे इत्यादी " या प्रधान शीर्षाखालील निधी
11) राज्य मानवी हक्क आयोगाचे कार्यालय
१२) राज्य अल्पसंख्यांक आयोगाचे कार्यालय
१३) राज्य निवडणूक आयोगाचे कार्यालय
१४) राज्य महिला आयोगाचे कार्यालय
१५) मंत्री परिषद व त्यांच्या कर्मचारीवर्गाची आस्थापना

६. २००८-०९ या आर्थिक वर्षाकरिता अर्थसंकल्प वितरण प्रणाली नवीन संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. सदर प्रणालीमध्ये आवश्यक ते नवीन बदल करण्यात आलेले आहेत. त्यानुसार अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर प्रशासकीय विभागांनी सादर केलेले मासिक निधी विवरणपत्र, वितरित करण्यात आलेले अनुदान, समर्पित रकमा या विषयीची माहिती .PDF स्वरुपात उपलब्ध होणार असून ते मुद्रित करणे शक्य होणार आहे. विभागांनी अशा प्रकारे काढण्यात आलेली मुद्रिते स्वाक्षरीत करून आदेशांच्या प्रतीसोंबत जोडावीत. प्रशासकीय विभाग/ नियंत्रक अधिकारी यांनी त्यांच्या इच्छेनुरुप अर्थसंकल्पिय अनुदान वितरणाचे लेखी आदेश निर्गमित करताना अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर अनुदान वितरणाच्या विवरणपत्राची छायांकित प्रत काढून लेखी आदेशासोबत जोडावी.संगणकीय प्रणालीवरील माहिती व प्रणालीबाहेरील आदेश यामधील विसंगती टाळण्यासाठी स्वतंत्र आदेश शक्यतो टाळावेत.

७.	सर्व प्रशासकीय विभागांना सूचित करण्यात येते की,सन २००७-०८ करिता काही विशिष्ट बाबींना प्रणालीमधून सूट देण्यात आली होती. मात्र सन २००८- ०९ करिता अर्थसंकल्प वितरण प्रणालीमधून कोणत्याही बाबींकरिता सूट देण्यात येणार नाही.

8.	काही वेळा या प्रणालीतून प्राधिकारपत्र (Budget Authorisation Slip) मुद्रीत करून घेण्यास अडचण येण्याची शक्यता नाकारता येत नाही. जर तांत्रिक अडचणीमुळे अर्थसंकल्प वितरण प्रणाली मार्फत वाटप करण्यात आलेल्या निधीसाठी देयके सादर करीत असताना अर्थसंकल्प प्रणालीतून प्राधिकारपत्र (Budget Authorisation Slip) मुद्रीत करण्याचा प्रयत्न केल्यानंतरही अशा प्रकारचे प्राधिकारपत्र प्राप्त झ् ााले नाही, तर तशा आशयाचे प्रमाणपत्र संबंधित आहरण व संवितरण अधिका-यांनी कोषागार अधिकाऱ्यांना सादर करावे. मात्र या प्रमाणपत्रामध्ये आहरण व संवितरण अधिकाऱ्यानी त्यांचेकडे त्या देयकासाठी अर्थसंकल्पिय तरतूद उपलब्ध असून प्रस्तावित खर्च मासिक निधीच्या मर्यादेत असल्याचेही प्रमाणित करावे लागेल व तसेच धनादेश प्राप्त होण्यापूर्वी व पुढील देयके सादर करण्यापूर्वी या देयकांचे प्राधिकार पत्र सादर करण्यात येतील अशी हमी द्यावी लागेल. अशा प्रमाणपत्राच्या आधारे कोषागार अधिकाऱ्यांनी देयके स्वीकारुन ती मंजूर करावीत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावांने,

(सु.प्र. कानडे)
उप सचिव, वित्त विभाग

प्रति,
राज्यपालांचे सचिव
मुख्यमंत्र्यांचे व उपमुख्यमंत्र्यांचे सचिव
सर्व मंत्री आणि राज्यमंत्री यांचे स्वीय सचिव
सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभाग
प्रशासकीय विभागांच्या नियंत्रणाखालील सर्व कार्यालयप्रमुख
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-1, महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-2, महाराष्ट्र, नागपूर.
प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-1, महाराष्ट्र, मुंबई.
महालेखापाल (लेखा परीक्षा)-2, महाराष्ट्र, नागपूर.
महालेखापाल (वाणिज्यिक लेखापरीक्षा), महाराष्ट्र, मुंबई.
* सचिव, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई
*प्रबंधक, उच्च न्यायालय (मूळ शाखा), मुंबई.
*प्रबंधक, उच्च न्यायालय (अपील शाखा), मुंबई.
*प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई.
*सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई.
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्यालय, मुंबई.
*सचिव, राज्य मानवी हक्क आयोग, मुंबई.
*सचिव, राज्य अल्पसंख्यांक आयोग, मुंबई.
*सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई.
*सचिव, राज्य महिला आयोग, मुंबई.
*प्रबंधक, लोक आयुक्त व उप लोक आयुक्त यांचे कार्या
सर्व विभागीय आयुक्त
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य वित्त व लेखा अधिकारी
संचालक लेखा व कोषागारे, मुंबई.
मुख्य लेखा परीक्षक, स्थानिक निधी लेखा, कोकण भवन
उप संचालक, लेखा व कोषागारे, पुणे, नाशिक, नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
सर्व कोषागार अधिकारी
सर्व उप कोषागार अधिकारी
जनसंपर्क अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
वित्त विभागातील सर्व कार्यासने
निवडनस्ती, वित्त विभाग, अर्थसंकल्प-4
*पत्राद्वारे

| | |
|---|---|
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |
| | |

| | |
|---|---|